Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket fro

# मॅनेजमेंटचे 'समर्थ' फंडे

22 Apr 2011, 0501 hrs IST

**SMS NEWS to 58888 for latest updates**

- डॉ. सुधीर निरगुडकर

महाराष्ट्राच्या भूमीला विविध संत महंतांमुळे अध्यात्माचे अधिष्ठान लाभले आहे. या संतांच्या मांदियाळीत आपल्या जीवनस्पर्शी शिकवणुकीमुळे उठून दिसणारे नाव म्हणजे समर्थ रामदासस्वामी. सन १६०८ ते १६८१ या कालखंडात होऊन गेलेल्या समर्थांनी' मना सज्जना भक्ती पंथेची जावे। तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे। असे म्हणून भक्तिमार्गाची दिशा दाखवली त्याचप्रमाणे तेव्हाच्या गांजलेल्या, खचलेल्या समाजाला धीर देऊन जुलमी शासकांविरुद्ध लढण्याचे बळही दिले. समर्थांच्या प्रतिभेचा आवाका विशाल होता. अक्षर वळणदार कसे काढावे इथपासून ते बाग कशी बनवावी इथपर्यंत नित्याच्या व्यवहारातील अनेक गोष्टींबाबत समर्थांनी केलेला उपदेश वाचल्यावर थक्क व्हायला होते. परमार्थाचा भगवा फडकवणाऱ्या समर्थांनी 'प्रपंच करावा नेटका' हे आवर्जून सांगितले होते. त्यामुळे त्यांच्या साहित्याला निव्वळ भक्ती वाङ्मयात जमा करणे योग्य ठरणार नाही.

माझा दासबोधाशी संबंध लहान वयातच आला. माझी आजी- माझ्या वडिलांची आई- निरक्षर होती. माझे वडील रोज दासबोधातील समासांचे वाचन करीत, ते ऐकून आजीने वडिलांकडे हट्ट धरला की मला तू लिहा वाचायला शिकव म्हणजे दासबोध मला स्वत:ला वाचता येईल आणि त्याप्रमाणे ती खरोखरच प्रयत्नपूर्वक वाचायला शिकली. पुढे एकदा माझ्या वडिलांचा- भाऊंचा पारा अगदी लहानशा कारणावरून चढला आणि ते माझ्या आईला ताडताड बोलू लागले तेव्हा आजीने त्यांना दासबोधातले एक वचन ऐकवले आणि सुनावले की, 'रोज जो दासबोध वाचतोस त्यातले शहाणपण का घेत नाहीस?' हे ऐकल्यावर आमच्या भाऊंचा राग चटकन निवळला. या प्रसंगामुळे मला दासबोधाविषयी अधिकच कुतूहल वाटू लागले आणि मी दासबोधाकडे वळलो.

सुरुवातीला त्यातील गंमतीशीर वाटणारी प्रकरणेच मी वाचत असे, पण वाढत्या वयाबरोबर दासबोधातील उपदेश, त्याचा अर्थ मनाला भिडू लागला आणि मी दासबोधाशी जोडला गेलो. या वाचनामुळे माझ्या स्वभावावर, वृत्तीवर, विचारांवर जे संस्कार झाले त्याची जाणीव मला नंतरच्या काळात झाली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एक बांधकाम उद्योजक म्हणून काम करताना, शेती करताना, कृषी मालाची निर्यात करताना, शैक्षणिक संस्था उभारताना, सामाजिक कार्यात सहभागी होताना. या सगळ्यासाठी समय नियोजनापासून ते मनुष्यबळ नियोजना-पर्यंत अनेक गोष्टी करताना मला जाणवले की हे सगळे मला याआधी दासबोधाने शिकवले आहे. समर्थांनी चारशे वर्षांपूर्वी दासबोध लिहिला तेव्हाची राजकीय, सामाजिक स्थिती वेगळी होती. परंतु तेव्हा 'महंत' घडवण्यासाठी समर्थांनी केलेला उपदेश आजच्या आधुनिक कॉर्पोरेट जगातील मॅनेजर्स आणि लीडर्सनाही उपयोगी पडणारा आहे. स्टीफन कोवे, पीटर ड्रकर अशा आधुनिक मॅनेजमेंट गुरूंचे विचार समर्थांच्या विचारांशी मिळते जुळते आहेत. आधुनिक व्यवस्थापनशास्त्राच्या चष्म्यातून दासबोधाकडे पाहताना 'महंत'च्या जागी टीम लीडर किंवा मॅनेजर आणि

परमेश्वरप्राप्तीच्या जागी ग्राहकहित अशी कल्पना केल्यावर समर्थांची व्यवस्थापन नीती स्पष्ट होते. 'मॅनेजमेंट बाय ऑबजेक्टिव्हज'. 'लेव्हल फाय लीडरशीप' अशा अनेक आधुनिक संकल्पना समर्थांच्या लेखनात सापडतात.

आधुनिक व्यवस्थापनात 'प्रोॲक्टिव्ह ॲटिट्यूड' अशी एक संकल्पना आहे. व्यवस्थापन गुरू स्टीफन कोवे म्हणतात की प्रोॲक्टिव्ह म्हणजे निव्वळ पुढाकार घेणे नव्हे तर आपली वागणूक आपल्याच धोरणांवर अवलंबून असते हे ओळखणे होय. समर्थांनी आपल्या 'शहाणपणाचा अभ्यास' या काव्यात जी लक्षणे विशद केली आहेत ती प्रोॲक्टिव्ह व्यक्तीची आहेत. समर्थांच्या वाङ्मयात राजकारणी नेत्यापासून ते उद्योजकांपर्यंत प्रत्येकाला घेण्यासारखे खूप काही आहे. नियोजन, संवाद कौशल्याचा विकास, मानवी संपदा व्यवस्थापन, विपणन, संघटना बांधणी, राजकीय व्यवस्थापन अशा अनेक मुद्यांवर समर्थांचे विचार या लेखमालेतून मांडण्याचा प्रयत्न मी करणार आहे. एक उद्योजक, शेतकरी, सामाजिक कार्यकर्ता म्हणून मला जसे हे मॅनेजमेंटचे 'समर्थ' फंडे पटले, उपयोगी पडले तसेच तुम्हालाही पडोत.

--------------------

डॉ. सुधीर निरगुडकर हे बांधकाम उद्योगात आपल्या व्यवस्थापकीय कौशल्याने यश मिळविणारे व्यवस्थापन तज्ज्ञ आणि 'एक असतो बिल्डर,' 'समर्थ रामदासांची व्यवस्थापन नीती' व 'राजमार्ग यशाचा' या पुस्तकाचे लेखक आहेत.

Tweet या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Siter
Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times S
This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum scree